Shri Manohar Keshav Randive Library-Tala

लोकमत

# तटकरे महाविद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धा

## विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके

**द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयामधील वार्षिक क्रीडा स्पर्धेत रंगलेला एक थरारक क्षण.**

लोकमत न्यूज नेटवर्क

**तळा :** येथील द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये २० आणि २१ डिसेंबर असे दोन दिवस वार्षिक क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेचे उद्घाटन तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थिती संस्थेचे सदस्य महादेव बैकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव क्रीडा विभागप्रमुख प्रा. भरत चाळके सहप्रमुख प्रा. विजय चव्हाण, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी कबड्डी, क्रिकेट, धावणे १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर, गोळाफेक, थाळीफेक, कॅरम, बुद्धिबळ अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. २० डिसेंबर रोजी झालेल्या कबड्डी (मुले) आणि मुली या दोन्ही स्पर्धांत बी.कॉम. वर्गाचा संघ विजयी झाला. क्रिकेट मुले आणि मुली या दोन्ही स्पर्धांमध्ये बी.ए. वर्गाचा संघ विजयी झाला. तसेच दिनांक २१ डिसेंबर रोजी वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला.

सुयोग्य नियोजनामुळे यशस्वीरीत्या या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी विशेष मेहनत घेतली.

Hello Raigad
Page No. 2 Dec 24, 2024
Powered by: erelego.com

# द.ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या क्रीडा महोत्सवास प्रारंभ

साहस वार्ता

तळे (पू. गो. मुळे) - द.ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या क्रीडा महोत्सवास आज पासून सुरुवात. महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा महोत्सव शुक्रवार दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी सुरू झाला असून या महोत्सवाचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष *मा. पुरुषोत्तम मुळे यांच्या शुभहस्ते झाले. त्यांनी उद्घाटनपर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना खेळातून व्यक्तिमत्व विकास कसा साधावा. तसेच खेळामध्ये प्राविण्य मिळवल्यानंतर शासकीय, निमशासकीय नोकरीमध्ये असणारे आरक्षण याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांना खेळण्यास प्रवृत्त केले. तसेच या कार्यक्रम प्रसंगी कार्यकारी मंडळाचे सदस्य मा. महादेव बैकर उपस्थित होते. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोनम पवार यांनी केले. प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख प्रा. भरत चाळके. यांनी केले. तर मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ.थोरात सर यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक,प्राध्यापकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## क्राईम

### खिंडवाडी येथे ट्रक पलटी

साहस वार्ता

सातारा : राष्ट्रीय महामार्गावर पुण्याहून कोल्हापूरकडे जात असलेल्या मालट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रक महामार्गावर पलटी झाला. या अपघातात ट्रकचालक किरकोळ जखमी झाला. ट्रकमधील मोकळे ड्रम रस्त्यावर पडल्याने काही वेळ वाहतुकीचा खोळंबा झाला. आज, दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. याबाबत माहिती अशी की, अपघातग्रस्त मालट्रक पुण्याहून कोल्हापूरला निघाला असताना खिंडवाडी येथील उतारावर कारने ट्रकला ओव्हरटेक करत कट मारला. यात ट्रकचालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले. दुभाजक तोडून ट्रक विरुद्ध दिशेला जाऊन महामार्गावर उलटला. सुदैवाने यावेळी तेथून कोणतेही वाहन जात नव्हते. अन्यथा मोठा अनर्थ घडला असता. या अपघातानंतर मालट्रकमधील मोकळे ड्रम रस्त्यावर विखुरले. कर्मचारी अपघात पाहण्यासाठी गर्दी केली होती. सातारा शहर पोलीस ठाण्यातील हवालदार कारळे हे कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले. महामार्गावर काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी काही वेळातच वाहतूक पूर्ववत केली. याबाबत शहर पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता.

### चोरीचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा

# द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा वार्षिक क्रीडा स्पर्धा संपन्न

साहस वार्ता

तळे (पू. गो. मुळे) - द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन दिनांक २० डिसेंबर २०२४ ते २१ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मा. श्री. पुरुषोत्तम मुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती संस्थेचे सदस्य श्री. महादेव बैकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. भरत चाळके, सहप्रमुख प्रा. विजय चव्हाण आणि प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी कबड्डी मुले आणि मुली, क्रिकेट मुले आणि मुली, रनिंग मुले आणि मुली १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर, गोळा फेक मुले आणि मुली, थाळी फेक मुले आणि मुली, कॅरम मुले आणि मुली, बुद्धिबळ मुले अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या कबड्डी (मुले) आणि मुली या दोन्ही स्पर्धेत इ.डे वर्गाचा संघ विजयी झाला. क्रिकेट मुले आणि मुली या दोन्ही स्पर्धेमध्ये इ.- वर्गाचा संघ विजयी झाला. तसेच दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्यामध्ये रनिंग १०० मीटर मध्ये प्रथम क्रमांक कु. समिधा माने द्वितीय क्रमांक कु. प्राची शिगवण आणि तृतीय क्रमांक कु. माधुरी मोडके यांनी पटकावला. रनिंग २०० मीटर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. समिधा माने द्वितीय क्रमांक कु. माधुरी मोडके आणि तृतीय क्रमांक कु. प्राची शिगवण यांनी पटकावला. रनिंग ४०० मीटर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. माधुरी मोडके द्वितीय क्रमांक कु. समिधा माने आणि तृतीय क्रमांक कु. वंदना शिगवण यांनी पटकावला. रनिंग ४०० मीटर मुले स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. रोहन बिर्जे द्वितीय क्रमांक कु. यश गवारकर आणि तृतीय क्रमांक कु. मोरेश्वर देवे यांनी पटकावला. गोळा फेक मुली प्रथम क्रमांक कु. समिधा माने द्वितीय क्रमांक कु. माधुरी मोडके तृतीय क्रमांक कु. श्रुतिका गोरीवले गोळा फेक मुले प्रथम क्रमांक मोरेश्वर देवे द्वितीय क्रमांक जयेश गोरिवले आणि योगेश सुतार तृतीय क्रमांक कु. रोहन बिर्जे यांनी पटकावला. थाळी फेक मुली प्रथम क्रमांक कु. समिधा माने द्वितीय क्रमांक श्रुतिका गोरिवले तृतीय क्रमांक वंदना शिगवण गोळा फेक मुले प्रथम क्रमांक कु. योगेश सुतार द्वितीय क्रमांक कु. यश गवारकर आणि मोरेश्वर देवे तृतीय क्रमांक कु. जयेश गोरिवले यांनी पटकावला. बुद्धिबळ मुले स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. यश गवारकर द्वितीय क्रमांक कु. हर्ष तावडे तृतीय क्रमांक कु. मोरेश्वर देवे यांनी पटकावला. कॅरम मुले या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक जय जसवळकर आणि हर्ष तावडे द्वितीय क्रमांक कु. यश गवारकर आणि मोरेश्वर देवे कॅरम मुली या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. मधुरी देवकर आणि भारती बडीगेर द्वितीय क्रमांक कु. वंदना शिगवण आणि प्राची शिगवण यांनी पटकावला. या स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी चांगला सहभाग नोंदविला. ही स्पर्धा यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी विशेष मेहनत घेतली. वरील स्पर्धासाठी पंच म्हणून श्री. निलेश साबळे यांनी काम पाहिले.

खटाव तालुक्यातील सोमवारी